**जिल्हा व सत्र न्यायालय, बीड**
नगर रोड, बीड
जा.क्रं. /लेखा/ ५५३८ /2026
दिनांक 03/06/2026
E- Mail :- mahbeedc@mhstate.nci.in

## ***निविदा सुचना***

**विषय :** **8 किलो क्षमतेची, टॉप लोड, एल. जी. कंपनीची ऑटोमॅटीक वॉशिंग मशीन** खरेदी करणेसाठी निवीदा पाठविणे बाबत..

जिल्हा न्यायालय, बीड करीता 01 नग 8 किलो क्षमतेची, टॉप लोड, एल. जी. कंपनीची ऑटोमॅटीक वॉशिंग मशीन स्थानिक बाजारातून खरेदी करण्यासाठी (सर्व करासहीत व कार्यन्वीत करुन देणेसहीत व वाहतुक खर्चासहीत ) स्थानिक व बाहेर गावाच्या अधिकृत विक्रेत्याकडुन निवीदा / दरपत्रके मागवीण्यात येत आहे.

मोहरबंद निविदा / दरपत्रके हे दिनांक 09/06/2026 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत किंवा त्यापुर्वी जिल्हा व सत्र न्यायालय, बीड या कार्यालयात पोहोचणे आवश्यक आहे. त्यानंतर प्राप्त झालेल्या मोहरबंद / दरपत्रकांचा या प्रकियेत समावेश करण्यात येणार नाही. तसेच खालील नमुद केलेले अटी व शर्ती मान्य असलेले व विहीत मुदतीत प्राप्त मोहरबंद निविदा / दरपत्रके शक्य झाल्यास दिनांक 10/06/2026 रोजी दुपारी 2.30 वाजता उघडण्यात येतील व पडताळणी अंती खरेदी समिती त्याबाबत उचित कार्यवाही करील. निवीदा स्विकारणेचा हा पूर्ण अधिकार मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश साहेब, बीड यांचा राहिल. सदरील बंद पाकीटावर **''एल. जी. कंपनीची ऑटोमॅटीक वॉशिंग मशीन खरेदी निविदा''** असे लिहिणे आवश्यक आहे.

हे कार्यालय कोणतेही कारण न सांगता प्राप्त झालेल्या मोहरबंद निविदा / दरपत्रके स्विकारण्याचे किंवा नाकारण्याचे सर्व अधिकार राखुन ठेवत आहे.

**अटी व शर्ती :--**

1. 01 नग 8 किलो क्षमतेची, टॉप लोड, एल जी कंपनीची ऑटोमॅटीक वॉशिंग मशीन चे दरपत्रक असणे आवश्यक आहे.
2. सदरहू यंत्राचे दर हे सर्व करासहीत असले पाहिजेत.
3. निविदाकारांनी निविदा / दरपत्रक सादर करतांना त्यावर जी.एस.टी./एस.जी.एस.टी. कमांक नमुद करणे आवश्यक आहे. जर नसेल तर तत्सम प्राधिकारणाकडील नोंदणी कमांक नमुद असलेले निविदाकाराच्या लेटर हेडवरील पदपत्रक वैध असतील.

04. निविदाकारांनी निविदा / दरपत्रकासोबत पॅनकार्डची छायांकित प्रत जोडणे बंधनकारक असेल.
05. प्रत्येक निविदाकारास फक्त एक निविदा / दरपत्रक सादर करण्याची परवानगी असेल.
06. सदरहू यंत्राबाबत कोणत्याही प्रकारचे आगाऊ रक्कमेचे प्रदान केले जाणार नाही.
07. वरील यंत्र पुरविण्याबाबत आदेश दिल्यास दिलेल्या मुदतीतच पुरवठा केला पाहिजे. अन्यथा आदेश रदद् समजणेत येईल यांची जबाबदारी संबंधीत पुरवठादार प्रतिष्ठानाची राहिल.
05. वरील यंत्र मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, बीड यांचे शासकीय निवासस्थान येथे पोहच करून कार्यान्वीत करण्याची जबाबदारी संबंधीत पुरवठादार प्रतिष्ठानाची राहिल. याकरीता वेगळा चार्जेस दिला जाणार नाही.
07. वॉशिंग मशीन खरेदी करणे करीता निवीदा स्विकारणे किंवा नाकारण्याबाबतचा पूर्ण अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,बीड यांना राहील.

08. काही वाद उद्‌भवल्यास न्यायक्षेत्र हे बीड जिल्हा न्यायालय राहिल.

09. निविदा उघडल्यानंतर सर्वात कमी दर असलेले विक्रेत्याने एल.जी. कंपनीचे वॉशिंग मशीन नमुना (Sample) बीड जिल्हा न्यायालय खरेदी समिती, बीड यांच्या समोर दाखवणे आवश्यक आहे.

10. एल.जी.वॉशिंग मशीन पोहच केल्यानंतर 15 दिवसाच्या आता देयकाची रक्कम अदा करण्यात येईल.

आदेशावरुन,
स्वाक्षरीत

प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय, बीड

**एक प्रत माहिती व कार्यावाहीस्तव सादर.**

6. संगणक विभाग प्रमुख, जिल्हा संगणक विभाग, जिल्हा न्यायालय, बीड – यांनी सदरील निविदा सुचना जिल्हा न्यायालय, बीड च्या संकेतस्थळावर अपलोड करावी.

प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय, बीड

D:\Account\Dead stock\Letter Purchasing25.26.odt